# लेखक परिचय

|| सौ. अजिता काळे ||

कथेच्या लेखिका. मूळच्या मुंबईच्या. शिक्षण: एम्.ए. (मराठी व भाषाशास्त्र) मुंबई विद्यापीठ. बी.ए. व एम्.ए. च्या परीक्षांत सुवर्णपदक. एम्.एस्.डब्ल्यू. (सोशलवर्क) युनिव्हर्सिटी ऑफ लुइव्हिल, केंटकी (अमेरिका) तेरा वर्षे भारताबाहेर वास्तव्य. सध्या अमेरिकेतील Family Planning Service of Western Illinois - ह्या संस्थेच्या संस्था प्रमुख म्हणून नोकरी. क्विल्टस किंवा गोधड्या तयार करण्याचा उद्योग (प्रदर्शनात पारितोषिके मिळाली आहेत.) संगीत ऐकण्याची व गायनाची आवड. तसेच वाचन व लेखनाची आवड. 'महाराष्ट्र फाऊंडेशन'च्या कार्यकर्त्या.

|| श्रीमती शोभा चित्रे ||

या कथेच्या लेखिका. मूळच्या मुंबईच्या असून नागपूर महाविद्यालयातून बी.ए. ची पदवी संपादन केली. १५ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. इंग्लंड, युरोप या ठिकाणी प्रवास केला असून सध्या वॉशिंग्टन डी.सी. येथे कायमचे वास्तव्य. वाचन व लेखनाची आवड.

|| सौ. इंदिरा रानडे ||

कथेच्या लेखिका. मूळ गाव फलटण (सातारा). वीस वर्षे भारताबाहेर वास्तव्य. इंग्लंडमध्ये प्रवास. सध्या सरकारी नोकरी. लेखन व वाचनाची आवड. 'वावटळ' कादंबरीच्या लेखिका.

|| श्री. मुकुंद सोनपाटकी ||

कथेचे लेखक. मूळचे कल्याणचे असून मुंबई विश्वविद्यालयामधून आर्किटेक्चरची पदवी संपादन केली. १८ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. ब्रिटनमध्ये प्रवास. सध्या आर्किटेक्ट म्हणून

नोकरी. लेखन, वाचन व फोटोग्राफीची आवड. 'दर्यापार' नावाचे स्वा.वीर सावरकरांच्या लंडनमधील वास्तव्यावर संशोधनात्मक लेखन.

|| श्री. नरेन्द्र सिन्दकर ||

कथेचे लेखक. मूळगाव पुणे. शिक्षण : बी.ए.पर्यंत. १८ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. मॉस्को व सर्व युरोपमध्ये प्रवास. सध्या मॉस्को–नभोवाणीवर निवेदक म्हणून नोकरी. वाचन व लेखनाचा छंद. 'क्रेमलिनच्या बुरूजावरून' ह्या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार. सध्या रामायणावर कादंबरी लिहीत आहेत. मॉस्को नभोवाणीचा इतिहास लिहून तयार.

|| श्रीमती ललिता गंडभीर ||

कथेच्या लेखिका. शिक्षण : अहिल्यादेवी हायस्कूल, पुणे, फर्ग्युसन कॉलेज, पुणे, महात्मा गांधी मेडिकल कॉलेज, इंदूर, बॉस्टन युनिव्हर्सिटी, पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल ट्रेनिंग. वीस वर्षे भारताबाहेर वास्तव्य. कॅनडा, इंग्लंड, जर्मनी, हॉलंड, ऑस्ट्रीया, स्वीत्झरलंड येथे वास्तव्य. सध्या पॅथॉलॉजिस्ट हा व्यवसाय.

श्री. शरद गंडभीर हे 'रिअल इस्टेट' डेव्हलपमेंटमध्ये आहेत. त्यांना मदत. 'एका वस्तीची कथा' ही अनुभवावर आधारित आहे. कथक नृत्य करतात. यांना अमेरिकन व भारतीय नाटकांची विशेष आवड आहे.

|| श्री. प्रभाकर दत्तात्रय दीक्षित ||

कथेचे लेखक. मूळचे पुण्याचे असून पुणे विद्यापीठाची बी.ए. (अर्थशास्त्र) पदवी प्राप्त केली. डिप्लोमा इन् जर्नालिझम (पंजाब), Diploma in Printing (Watford U.K.), B.S. in Printing & Journalism हा तीन वर्षांचा अभ्यासक्रम प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. 'लॉर्ड—माऊंट-बॅटन' स्कॉलरशिप मिळाली असून अमेरिकेत प्रिंटिंगच्या उच्च शिक्षणासाठी इंडिया फौंडेशनतर्फे निवड. जगप्रसिद्ध 'गॉस मिली' ह्या कंपनीतर्फे शिष्यवृत्ती

मिळाली. B.S. ही प्रिंटिंगची पदवी, R.I.T. ह्या अमेरिकन शिक्षण संस्थेतून प्रथम क्रमांकाने संपादन केली.

२२ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. इंग्लंड, युरोप, अमेरिका, जर्मनीमध्ये शिक्षणानिमित्त काही महिने वास्तव्य. सध्या मुद्रणशास्त्रतज्ज्ञ म्हणून काम करीत आहेत. तसेच Colour Printing – Colour Reproduction – Colour Correction ह्यावर संशोधनात्मक अभ्यास सुरू आहे. लेखन व संगीत याची आवड.

|| श्री. यशवंत कानिटकर ||

कथेचे लेखक. मूळगाव: पालशेत (रत्नागिरी). शिक्षण: एम्.एस्सी. (मॅथ्स) व एम्.एस्सी. (स्टॅटिस्टिक्स) मुंबई विद्यापीठ, Associate of Society of Actuaries च्या पाच परीक्षा झाल्या आहेत. १६ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. इंग्लंड, अमेरिका या ठिकाणी प्रवास. सध्या Actuary चाच व्यवसाय करतात. साप्ताहिक 'सोबत' मध्ये 'नदी थेम्सच्या किनारी' व 'अतलांटिकचे वारे' ही सदरे चालविली. 'पश्चिम वारे' व 'काळे दिवस' ह्या पुस्तकांचे लेखक. Maharashtra Foundation च्या स्थापनेत पुढाकार.

|| सौ. स्मिता पालिवाल ||

कथेच्या लेखिका. शिक्षण: एम्.एस्सी. बायकेमेस्ट्री. मूळगाव मुंबई. ६ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. न्यूयॉर्क येथे प्रवास. Medical Technologist हा सध्याचा व्यवसाय. वाचन व लिखाणाची आवड.

|| श्री. श्रीनिवास नी. माटे ||

कथेचे लेखक. जे.जे.स्कूल ऑफ आर्किटेक्चर, मुंबईमधून बी. आर्च, आणि कॅन्सास स्टेट युनिव्हर्सिटी यू. एस.ए. मधून एम्.आर्च.ची पदवी प्राप्त केली. २० वर्षे भारताबाहेर वास्तव्य. सध्या असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट मॅक्सवेल स्टार्कमन असोसिएटस्, बेव्हरली हिल्स, कॅलिफोर्निया येथे नोकरी. वाचन, कविता व फोटोग्राफीचा छंद.

|| श्री. अमान मोमीन ||

कथेचे लेखक. मूळगाव वडगाव (पुणे). शिक्षणानिमित्ताने कोल्हापूर, कराड, इंदूर, मुंबई या ठिकाणी वास्तव्य. शिक्षण: बी.ए. (ऑनर्स). हिंदी-मराठी-इंग्लिश, राजाराम कॉलेज, कोल्हापूर, पुणे विद्यापीठ एम्.ए. हिंदी-संस्कृत, मुंबई विद्यापीठ. १९६९ साली 'Immigrant' होऊन अमेरिकेला गेले. रॉचेस्टर, वॉशिंग्टन व वर्जिनिया या ठिकाणी वास्तव्य. सध्या न्यूयॉर्कमध्ये राहतात व U.S. Information Agency ह्या अमेरिकन सरकारी माहिती मंत्रालयात Programme Officer. संगीत, नाटक, सिनेमा वाङ्मयाची आवड. अमेरिका व कॅनडात "चल जाऊ कोल्हापुरी!" हा स्वलिखित एकपात्री प्रयोग सादर करतात.

|| डॉ. जयंत भालचंद्र बापट ||

कथेचे लेखक. मूळगाव वाई (सातारा). शिक्षण: बी.एस्सी. (मुंबई), एम्.एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री, बडोदे), पी.एच.डी. (मोनॅश विद्यापीठ, मेलबोर्न ऑस्ट्रेलिया), एम.एस.सी. (रसायन-शिक्षण, ईस्ट-अंग्लिया विद्यापीठ, इंग्लंड) १८ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या ठिकाणी प्रवास. सध्या ऑरगॅनिक केमिस्ट्री चिझोम इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी : मेलबॉर्न ऑस्ट्रेलिया येथे नोकरी. वक्तव्य (टोस्टमास्टर्स इंतरनॅशनलतर्फे A. T. M. ही पदवी). छायाचित्रण, स्वयंपाक, बागकामाची आवड. भारतीय धार्मिक विधींचे परदेशाला साजेशा दृष्टीने रूपांतर करून ऑस्ट्रेलियात पूजा, लग्नं वगैरे गोष्टी छंद म्हणून लावतात.

|| श्री विजय पंडित ||

कथेचे लेखक. मूळगाव तुरंबव (रत्नागिरी). शिक्षण मुंबईत. मुंबई विद्यापीठाची एम्.एस्सी. पदवी, अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ मेलिरंडमधून एम्.बी.ए., वॉशिंग्टन डी.सी. व स्टेट ऑफ मेरिलँडमधून सर्टिफाईड पब्लिक अकौन्टट. १४ वर्षे भारताबाहेर

वास्तव्य. प्रवास-इंग्लंड व अमेरिका. सध्या अमेरिकेतील 'नॅशनल रेलरोड पॅसेंजर कॉर्पोरेशन' मध्ये प्लॅनिंग अॅण्ड कंट्रोल डिपार्टमेंटचे चीफ म्हणून नोकरी. तसेच 'युनिव्हर्सिटी ऑफ मेरिलँड', कॉलेज पार्क येथे लेक्चरर, 'अमेरिकन इन्स्टिट्यूट आफ सर्टिफाईड पब्लिक अकौन्टंटस्' या संस्थेची मेंबरशीप. त्याचप्रमाणे स्टेट ऑफ मेरिलँड मधील पब्लिक अकौन्टन्सीचे व्यावसायिक, परवाना, मराठी कथा, कविता, ऐकणे, वाचणे व लिहिण्याची आवड.

|| श्रीमती आशा दामले ||

कथेच्या लेखिका. मूळगाव मुंबई. एम्.ए.बी.टी. पर्यंत शिक्षण, बावीस वर्षे भारताबाहेर वास्तव्य. ब्रिटनमध्ये प्रवास. इंग्लिश व गणित विषयांच्या निवृत्त शिक्षिका. 'भूमि' कथासंग्रहाच्या लेखिका. इंग्लिश वाङ्मयाचा सध्या अभ्यास करीत आहेत.

|| श्रीमती वासंती अभ्यंकर ||

कथेच्या लेखिका. मूळगाव औरंगाबाद असून शिक्षण बी.ए.पर्यंत झाले आहे. १६ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. काव्यलेखन, पेंटिंग, फोटोग्राफी, संगीत याची विशेष आवड असून सध्या 'बॅचलर-इन-फाइन आर्टस्'चा अभ्यास करीत आहेत.

|| श्रीमती संध्या कर्णिक ||

कथेच्या लेखिका. मूळच्या दादर-मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची पदवी संपादन केली. Computer Programming आणि Experimental Psychology मध्ये ६ कोर्स पूर्ण. तेरा वर्षे भारताबाहेर वास्तव्य. सध्या Expeditor (Sales Supervisor) in a department store मध्ये नोकरी. लेखन, प्रवास, संगीताची आवड. प्राथमिक शाळेतील मुलांना Computer Programming शिकवतात. महिन्यातून एकदा भारतीय स्त्रियांना एकत्र बोलावून होणाऱ्या चर्चासत्राच्या सूत्रधार व त्या अनुषंगाने लेखन करतात.

|| श्री. विजय पाठारे ||

कथेचे लेखक. मूळचे वांद्रे, मुंबई येथील. शिक्षण एल्. एल्. बी. मुंबई, बार ॲटली (Inner Temple, London) १३ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. ब्रिटन, अमेरिका या ठिकाणी प्रवास, सध्या न्यूयॉर्क येथे असतो, न्यूयॉर्कमध्ये तीन संगीतिका सादर केल्या. स्वरछंद नाट्यनिर्मित. विशेष आवड लेखन-दिग्दर्शन.

|| श्री. राजन गडकरी ||

कथेचे लेखक. मूळगाव मुंबई. शिक्षण एम्.एस्. (मॅनेजमेंट सायन्स) १५ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. अमेरिकेत प्रवास. सध्याचा व्यवसाय Management Scientist. स्वयंपाकाची आवड.

|| श्री. दिलीप वि. चित्रे ||

कथेचे लेखक. मूळगाव बडोदा. १९६४ साली महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा येथून स्थापत्यशास्त्राची पदवी प्राप्त केली. १५ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. इंग्लंड, अमेरिका, या ठिकाणी प्रवास. सध्या वॉशिंग्टन येथे वास्तव्य असून तेथील एका कंपनीत आर्किटेक्ट म्हणून नोकरी. लेखन, वाचन आणि कवितांची विशेष आवड. अमेरिकेतील 'केसरी' चे प्रतिनिधी. 'ऐलतीरावर' आणि "स्वर हे पश्चिमरंगी" या ध्वनिमुद्रिकांतील गीतांचे लेखक. 'मराठी चित्रपट महोत्सवा' चे अमेरिका-कॅनडातील प्रमुख सूत्रधार.

|| श्री. नरेश शहा ||

कथेचे लेखक. मूळचे मुंबईचे. प्राथमिक शिक्षण सर नारायण चंदावरकर मराठी मुलां-मुलींची प्राथमिक शाळा, मुंबईमध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. १९६६ साली सर जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मुंबईमधून B. Arch. ची पदवी प्राप्त केली. १३ वर्षे भारताबाहेर वास्तव्य. भूतान, अमेरिका या ठिकाणी प्रवास. शिल्पशास्त्रज्ञ हा सध्याचा व्यवसाय. वाचन, चित्रकला, चित्रपट, संगीत, नाटके व स्वयंपाकाची आवड. 'ऐलतीरावर' ह्या ध्वनिमुद्रिकेचे

वेष्टन केले. M.F.F.C.C. मराठी चित्रपट महोत्सव, Indian Experimental Theatre व पश्चिमाचे कार्यकर्ते

|| डा. अशोक काळे ||

कथेचे लेखक. मूळगाव पुणे, शिक्षण: एम्.बी.बी.एस.एम्.डी. (फार्मकालॉजी), फेलो ऑफ द अमेरिकन अकॅडेमी ऑफ पिडिआट्रिक्स, यू.एस्.ए. तेरा वर्षे भारताबाहेर वास्तव्य. सध्या बालरोगतज्ज्ञ, खाजगी वैद्यकीय व्यवसाय. लेखन-वाचनाची आवड, तसेच लाकडी वाचनाची आवड, तसेच लाकडी वस्तू तयार करण्याचा छंद, गोल्फ खेळतात.